# सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती
## शासकीय तंत्र निकेतन परीसर, गाडगेनगर अमरावती
Email:-roamravati@dtemaharashtra.gov.in internet-http://www.jdroamt.org
Phone:- ०७२१-२५७३०२७, २५७२५७७ Fax No.-०७२१-२६६१४५३


क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१७/७४९८
दि. 27 JUN 2017

**प्रति,**

**प्राचार्य**
**अमरावती जिल्हयातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित**
**अभियांत्रिकी/औ.नि.शास्त्र पदवि/पदविका संस्था**

विषय:- **४ कोटी वृक्ष लागवड अभियान.**
सायकल रॅली/वृक्ष दिंडीचे आयोजनाबाबत.

संदर्भ:- उपवनसंरक्षक, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष-शिली-१/४ कोटी वृक्ष लागवड/३८१/२०१७-१८ दि. २४.६.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्यात ४ कोटी वृक्ष लागवड अभियान कार्यक्रमांतर्गत १ जूलै २०१७ ते ७ जुलै २०१७ हा कालावधी **"वनमहोत्सव कालावधी"** म्हणून साजरा करण्यात येणार आहे. वृक्ष लागवड अभियानाचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने **बुधवार दि. २८ जून २०१७ रोजी सकाळी ९.०० वाजता सायकल रॅली व दि.३० जून २०१७ रोजी वृक्ष दिंडीचे आयोजन** करण्यात येणार असल्याचे संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. उपवनसंरक्षक अमरावती विभाग, अमरावती यांचे संदर्भीय पत्र आवश्यक कार्यवाहीकरीता सोबत जोडले आहे.

**सोबत:-** वरील प्रमाणे

प्र.सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय
अमरावती

**प्रतिलिपी:-** संगणक प्रोग्रामर, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

**उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती यांचे कार्यालय**
**कॅम्प, अमरावती-444 602**
कार्यालयीन दुरध्वनी 2662814 / 2662480. 2550144 (वैयक्तिक),2662814
वनसंपर्क दुरध्वनी (नि:शुल्क) 155314 (फक्त लॅन्डलाईन संपर्कासाठी)
ई-मेल पत्ता dcfamtdn14@gmail.com

पत्र

विषय : **04 कोटी वृक्ष लागवड अभियान**
सायकल रॅली / वृक्ष दिंडीचे आयोजना बाबत
क्रमांक : कक्ष-शिली-1/4-कोटी वृक्ष लागवड/381/2017-18
अमरावती-2,दिनांक 24/06/2017

प्रति,

मुख्याध्यापक
जिल्हा परिषद विभाग
अमरावती

महाराष्ट्र राज्यात दिनांक 01 जुलै, ते 07 जुलै, 2017 हा कालावधी **"वनमहोस्तव कालावधी"** म्हणुन साजरा करण्यात येणार आहे. सदर कालावधीत संपुर्ण महाराष्ट्र राज्यात 04 कोटी वृक्ष लागवड अभियान राबविण्यात येणार आहे. सदर **वृक्ष लागवड अभियानाचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने बुधवार, दिनांक 28 जुन, 2017 रोजी सकाळी ठिक 9.00 वा. सायकल रॅलीचे व दिनांक 30 जुन, 2017 रोजी वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे.**

त्याअनुषंगाने, सदर दिनांकास आपले कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी (मुख्यालय-अमरावती) यांना, सायकल रॅली व वृक्ष दिंडीमध्ये सहभाग घेण्यासाठी आपलेस्तरावरुन प्रेरित करणे अभिप्रेत आहे. जेणे करुन सायकल रॅली/ वृक्ष दिंडीचे माध्यमातून जनसामान्याचे लक्षवेध होऊन वृक्ष लागवडी बाबत सकारात्मक संदेश जाईल व त्यांचेमध्ये जागरुकता निर्माण होऊन वृक्ष लागवड मोहिमेला पाठबळ मिळुन ती प्रभावी तथा यशस्वीपणे पार पाडता येईल. या करिता आपले सहकार्य अपेक्षित आहे.

सायकल रॅली व वृक्षदिंडी बाबतचा मार्गदर्शक तक्ता यासोबत माहिती करिता संलग्न करण्यात येत आहे.
(टिप :सायकल रॅली मध्ये सहभागी होणेकरिता स्वत:ची सायकल असणे आवश्यक आहे. कृपया नोंद घेण्यात यावी)
सहपत्र : वरिल प्रमाणे.

(हेमंत मिना)
उपवनसंरक्षक,
अमरावती वनविभाग, अमरावती

2058 27/06/17

## सायकल रॅली / वृक्ष दिंडी बाबत मार्गदर्शक तक्ता खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | कार्यक्रमाची रुपरेषा | ठिकाण मार्ग / स्थळ |
|---|---|---|
| 1 | दिनांक 28 जुन, 2017 रोजी,<br>सायकल रॅलीला हिरवी झेंडी दाखविणे सकाळी 9.00 वा. | सुरुवात मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), अमरावती यांचे कार्यालय -- पोलीस आयुक्त शहर कार्यालय मार्ग -- शिवटेकडी (मालटेकडी) मार्ग -- बस स्टॅन्ड -- रेल्वे स्टेशन चौक -- राजकमल चौक-- जयस्तंभ चौक-- इर्विण चौक-- गर्ल्स हायस्कुल चौक-- समारोप बचत भवन,अमरावती (महानगर पालिका आयुक्त यांचे निवासस्थान जवळ) |
| 2 | दिनांक 30 जुन, 2017 रोजी वृक्ष दिंडी वृक्ष पुजन सकाळी 9.00 वा. | सुरुवात जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय-- इर्विण चौक--रेल्वे स्टेशन चौक--बस स्टॅन्ड-- पोलीस पेट्रोल पंप-- ग्रॅन्ड महफिल हॉटेल--- गर्ल्स हायस्कुल चौक-- समारोप बचत भवन,अमरावती<br>(महानगर पालिका आयुक्त यांचे निवासस्थान जवळ) |

(टिप : समारोप कार्यक्रमास्थळी अल्पपोहराची व्यवस्था करण्यात येईल.)

वनमहोत्सवाकरीता सामाजिक वनीकरणच्या रोपवाटीकेत सवलतीच्या दराने रोपे उपलब्ध होतात.

९. **रोपे लागवडीनंतर किती वर्ष पाणी द्यावे लागते?**

रोपांना २ ते ३ वर्ष पाणी देणे योग्य ठरते. त्यानंतर पावसाचे पाण्यावर वाढु शकतात.

१०. **घराचे परिसरात कोणती वृक्षे लावावीत?**

घराच्या परिसरात मोठी घेरेदार वृक्ष लावु नयेत.

११. **मोठी वृक्षे घराच्या बांधकामापासून किती अंतरावर लावावीत?**

मोठी वृक्षांची उदा. वड, पिंपळ, आंबा, चिंच अशी वृक्षे घराच्या बांधकामापासून किमान १० फुट अंतरावर लागवड करावी. अन्यथा, अशा वृक्ष प्रजातींच्या मुळामुळे बांधकामास तडे जावु शकतात.

१२. **दाट सावली देणारे वृक्ष कोणते?**

कडुनिंब, वड, पिंपळ, आंबा, चिंच, बकुल, करंज, सप्तपर्णी, हत्तीफळ, पापडा, मोहा, गोंधण, रिठा ही दाट सावली देणारी वृक्षे आहेत.

१३. **शेताचे बांधावर लावणाच्या प्रजाती कोणत्या आहेत?**

शेताचे बांधावर जमिनीच्या प्रतीनुसार लागवड करावी. उदा. उत्तम पाण्याचा निचरा असणाऱ्या मुरमाड जमिनीवर सागवान, बिजा, तिवस, बांबु, सिताफळ, बोर, आवळा, मोहा व पाण्याचा निचऱ्या नसणाऱ्या जमिनीवर अर्जुन, बाभूळ, कडुनिंब, निलगिरी, करंज, जांभूळ, कवठ, शिवण.

१४. **शेतीच्या सभोवताल कुंपणासाठी कोणत्या प्रजाती लावाव्यात?**

शेतीच्या कुंपणासाठी बांबू, सिताफळ, सागरगोटी, करवंद, चिलाटी अश्या प्रजातींची लागवड करावी.

१५. **जमिनीची धुप थांबवण्यास कोणत्या प्रजाती लावाव्यात?**

जमिनीची धुप थांबवण्यासाठी बांबू, वायपात, खसगवत घासारख्या प्रजाती लावाव्यात.

१६. **वृक्ष लागवडीसाठी तांत्रीक मार्गदर्शन कोठे मिळेल?**

लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण यांचेकडे तांत्रीक मार्गदर्शन उपलब्ध होईल.

१७. **शोभिवंत वृक्ष कोणते?**

कांचन, पेल्टोफोरम, गुलमोहर, अमलतास, गोड बदाम, इंडीयन कॉर्क (बुच), बॉटलब्रश, पेन्टी, चाफा, पारिजात.

१८. **पक्षी आकृष्ट होणारे वृक्ष कोणते?**

वड, पिंपळ, निम, फळझाडे प्रामुख्याने आंबा, जांभूळ, मोहा, चिंच, फणस.

१९. **सातत्याने ऑक्सीजन उत्सर्जित करणारे प्रमुख वृक्ष कोणते?**

पिंपळ, वड, उंबर, निम.



# ४ कोटी वृक्षारोपण

## आपल्या भावी पिढीसाठी !

**१ ते ७ जुलै २०१७**

चला वृक्षारोपण करु या ... महाराष्ट्राचे भविष्य हरित करुया


**मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती**

फोन : ०७२१-२६६२०९०

Email : ccftamravati@mahaforest.gov.in

प्रस्तावना

जैवीक उष्णतेमध्ये होणारी वाढ, हवामानातील बदल याबाबत जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात विचारमंथन सुरु झाले आहे. याचाच एक भाग म्हणुन शासनाने विविध विभाग व जनतेच्या सहभागातून सन २०१६ मधील पावसाळ्यात वन महोत्सव कालावधीत दि. १ जुलै २०१६ या एकाच दिवशी किमान २.८१ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली आहे. तर २०१७ मध्ये ४ कोटी वृक्ष लागवड, २०१८ मध्ये १३ कोटी वृक्ष लागवड व २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्ष लागवड याप्रमाणे एकुण ५० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. या कार्यक्रमाचा हरित महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पाचा दुरगामी व प्रभावीपणे उपयोग होणार आहे. या कार्यक्रमामध्ये शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, एन.एस.एस., एन.सी.सी., स्काऊट अॅन्ड गाईडस्, अशासकीय स्वयंसेवी आणि सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्था, औद्योगीक समूह, सीएसआर, लोकप्रतिनिधी, गृहनिर्माण संस्था, सहकारी संस्था, शासकीय कर्मचारी/अधिकारी इत्यादींचा सहभाग असेल.

रोपे आपल्या दारी योजनेचा उद्देश

महानगर पालीका / नगर पालीका /नगर परिषद / नगर पंचायती या ठिकाणी वाढत्या शहरीकरणामुळे झाडांची संख्या कमी झाल्यामुळे वातावरणामध्ये बदल तसेच प्रदुषणामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे नागरी वस्तीत असलेल्या परिसरामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लागवड करुन वातावरणामध्ये होणारे बदल व प्रदुषण नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरीकांना रोपे लागवडीकरीता सुलभतेने प्राप्त व्हावी जेणेकरुन सदर रोपे आपले घराच्या परिसरामध्ये लावतील व त्यामुळे तापमानातील तिव्रता कमी होवून प्रदुषण नियंत्रणास मदत होईल व त्यामुळे परिसरातील वावर सुसह्य होईल. या उद्देशाने वन विभागाकडुन दिनांक २५ जून ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत '' रोपे आपल्या दारी '' हि योजना राबविण्यात येत आहे.

योजनेचा कालावधी

टप्पा १ : दिनांक २५ जून ते ३० जून, २०१७

या कालावधीत नागरीक त्यांचे आवश्यकतेनुसार लागवडीकरीता रोपे वनमहोत्सव केंद्रावरुन घेवून जातील

टप्पा २ : दिनांक ०१ जुलै ते ०७ जुलै, २०१७

या कालावधीत सदर रोपे वन विभागामार्फत नागरीकांनी सांगितलेल्या ठिकाणावर वृक्षमित्रा मार्फत पोहचविण्यात येतील. तसेच वनमहोत्सव केंद्रातही उपलब्ध राहतील.

- सदर योजनेमध्ये शहरातील मध्यवर्ती ठिकाणी अथवा आवश्यकतनूसार जास्त ठिकाणी वनविभागाकडून रोपे पुरवण्याकरीता वन महोत्सव केंद्रे उघडण्यात येतील.

- प्रत्येक घराकरीता जास्तीत जास्त ५ रोपे व प्रत्येक गृहनिर्माण संस्था/इतर संस्था करीता जास्तीत जास्त २५ रोपे शासकीय दराने पुरविण्यात येतील.

- रोपे कशी लावावीत व रोपे लावल्यानंतर त्याची काळजी कशी घ्यावी याबाबतच्या सुचना असलेले माहितीपत्रक रोपे देते वेळी संबंधीतांना पुरविण्यात येईल तसेच वृक्षमित्रदेखील त्याबाबत मार्गदर्शन करतील.

- ज्या व्यक्तीला रोपे पुरवठा केला आहे, त्याचे नांव, पत्ता व संपर्क क्रमांक इ. नोंदी वन महोत्सव केंद्रावर ठेवल्या जातील.

- रोपे मिळण्याकरीता वन विभागाकडून देण्यात आलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधणे आवश्यक आहे.

- रोपांची वाहतूक पाहण्याकरीता प्रत्येक वन महोत्सव केंद्रावर आवश्यकतेनूसार मोबाईल धारक वृक्षमित्र दुचाकी/रिक्षासह नेमण्यात येतील. सदर वृक्षमित्र दुचाकी/रिक्षावरुन रोपे संबंधीतांना पुरवठा करतील. जर मोठ्या प्रमाणात मागणी असेल तर (गृहनिर्माण संस्था/इतर संस्था) इत्यादी ठिकाणी वनविभागाचे वाहना व्दारे रोपांचा पुरवठा केल्या जाईल.

## वृक्ष लावा दारोदारी
## समृध्दी येईल घरोघरी

